# बृहन्मुंबई महानगरपालिका

ई-दरपत्रिका

**सआकेद/२००५/सअ(परि.)/जन. दिनांक:०३.०९.२०२६**

सहाय्यक आयुक्त, के/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,
के/दक्षिण विभाग कार्यालयीन इमारत,
खोली क्र. १०१ पहिला माळा, आझाद रोड,
गुंदवली, अंधेरी (पूर्व) मुबंई-४०००६९.
दु. क्र. २६८३७१०४

के/दक्षिण विभागांतर्गत खाली दर्शविलेल्या कामासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका मान्यता प्राप्त संस्था / कंत्राट्दारांकडून तातडीच्या कामासाठी, तात्काळ निविदा / दरपत्रिका मागविण्यात येत आहेत. मान्यताप्राप्त इच्छुक संस्था / कंत्राट्दारांनी दि. ०३.०९.२०२६ ते ०७.०९.२०२६ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ०१.०० वाजेपर्यंत दूसरा मजला, मुख्य लिपिक (व्यय), के/दक्षिण विभाग यांजकडून रु. ३६३/- अधिक वस्तू व सेवा कर (GST) इतकी रक्कम भरून निविदा / दरपत्रिका फॉर्म खरेदी करण्यात यावा.

इसारा अनामत रक्कम (EMD) रु. ६०००/- DD/CASH द्वारे भरून त्याची पावती निविदा / दरपत्रिकेच्या लिफाप्या सोबत जोडण्यात यावी व मुख्य लिपिक (व्यय) के/पूर्व विभागातील निविदा / दरपत्रिका पेटीमध्ये मोहरबंद निविदा / दरपत्रिका लिफाफा टाकण्यात यावा व तो लिफाफा दिनांक ०७.०९.२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजता किंवा त्यानंतर उघडण्यात येईल.

तसेच मोहरबंद निविदा / दरपत्रिका स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार संपूर्णपणे मा. सहाय्यक आयुक्त, के/पूर्व विभाग यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली स्थळ निविदा / दरपत्रिका स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे वर्णन | अंदाजित किंमत |
|---|---|---|
| १ | के/दक्षिण विभागातील प्रभाग क्र.७६ मधील न.भू.क्र. ५६, कोंडीवाटे, स्टरलिंग कोर्ट सोसायटी समोर, एमआयडीसी रोड नं.१६, अंधेरी (पूर्व) येथील कृत्रीम तलावात आगामी गणपती विसर्जन-२०२६ करिता मंडप डेकोरेशन, तसेच इतर कामे करण्याबाबत. | रु. २,२४,६१५.५७ |
| २ | के/पूर्व विभागातील प्रभाग क्र.७६ मधील न.भू.क्र. ५६, कोंडीवाटे, स्टरलिंग कोर्ट सोसायटी समोर, एमआयडीसी रोड नं.१६, अंधेरी (पूर्व) येथील कृत्रीम तलावात आगामी गणपती विसर्जन-२०२६ करिता आवश्यक पाणी टॅकर व डंपर ताडपत्री इत्यादी पुरविणेबाबत. | रु. २,९८,९१०.०० |

| | | |
|---|---|---|
| ३. | के/दक्षिण विभागातील प्रभाग क्र.७६ मधील न.भू.क्र. ५६, कोंडीवाटे, स्टरलिंग कोर्ट सोसायटी समोर, एमआयडीसी रोड नं.१६, अंधेरी (पूर्व) येथील कृत्रीम तलावात आगामी गणपती विसर्जन-२०२६ करिता गणेश मूर्ति विसर्जन करिता कामगार पुरविणेबाबत. | रु. १,७८,४२५.०० |
| ४. | के/दक्षिण विभागातील प्रभाग क्र.७६ मधील न.भू.क्र. ५६, कोंडीवाटे, स्टरलिंग कोर्ट सोसायटी समोर, एमआयडीसी रोड नं.१६, अंधेरी (पूर्व) येथील कृत्री०म तलावात आगामी गणपती विसर्जन-२०२६ करिता स्वागत मंडप, आरती मंडप स्टेज, तसेच इतर कामे करण्याबाबत. | रु.२,९२,३९९.०० |

सदर स्थळ निविदेमध्ये काही बदल झाल्यास सहाय्यक आयुक्त, के/पूर्व विभागातील सुचना फलकावर लावण्यात येईल.

सही/-

सहाय्यक अभियंता (परिरक्षण-१) के/पूर्व विभाग